# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २२३-२२** **दिनांक २५/०७/२०२२**

## ३ वर्षाच्या अपहृरीत मुलाचा शोध घेवुन त्यास पालकांचे ताब्यात देण्यास पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथक व गुन्हे शाखा-३ यांना यश.

दिनांक १९/०७/२०२२ रोजी १५.३० वा. चे सुमारास पेल्हार पोलीस ठाणे हद्दीतील एन.बी.एस. चाळ, दुर्गामाता मंदिराजवळ, संतोषभुवन, नालासोपारा (पु.), ता. वसई, जि. पालघर येथुन ०३ वर्षाच्या लहान मुलास कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेले बाबत फिर्यादी श्रीमती. निती राठोड यांनी दिलेल्या तक्रारी वरुन पेल्हार पोलीस ठाणे येथे I गु.रजि.नं. ६२०/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता

सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी अपहरण झालेल्या मुलाचा तात्काळ शोध घेवून सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याबाबत दिलेल्या सुचना व मार्गदर्शना प्रमाणे नमुद गुन्हयाचे अनुषंगाने पेल्हार पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन घटनास्थळावर मिळालेल्या माहितीच्या आधारे सदर मुलाचा शोध घेत असतांना तो रस्त्याने पायी चालत जात असतांना दिसून आले. काहि अंतरावर एका ठिकाणी सदर मुलगा हा रिक्षात बसुन जात असतांना दिसुन आल्याने सदर रिक्षाचा माग घेवून रिक्षा चालक हा दिनांक २२/७/२०२२ रोजी मिळून आला व सदर लहान मुलगा देखील त्याचे कब्जात मिळून आला. सदर मुलास त्याचे आईवडिलांचे ताब्यात देण्यात आले असून रिक्षा चालकाने लहान मुलाचे पालकांचा शोध घेण्याकरिता ३ दिवस कोणत्याही प्रकारचा प्रयत्न केला नाही तसेच पोलीसांना देखील कळविले नाही. त्यामुळे सदर रिक्षाचालकाविरुध्द कारवाई करुन त्यास मा. न्यायालयात हजर राहण्याबाबत समज देण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. प्रमोद बडाख, पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा-३, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनि/सनिल पाटील, पोउपनिरी/नितीन कोळी, पोउपनिरी/शिवाजी खाडे, गुन्हे शाखा-३, पोहवा/योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, पोना/प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, रोशन पुरकर, किरण आव्हाड, बालाजी गायकवाड, गुन्हे प्रकटीकरण शाखा- पेल्हार तसेच गुन्हे शाखेचे पोहवा/सागर बारवकर, मनोज चव्हाण, सचिन घेरे, पोना/मनोज सकपाळ, पोअं/राकेश पवार यांनी कौशल्यपुर्वक पार पाडली आहे.